दिनांक: २० सप्टेंबर २०२१

मासिकांक ७

"ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ.सायली अक्षय देशपांडे

अनुक्रमणिका

	शीर्षक	लेखिका	पान क्र.
१	प्रस्तावना	सायली अक्षय देशपांडे	३
२	दोन शब्द	अक्षय प्रभाकर वाटवे	४
३	प्रभात	संजीवनी मराठे	६
४	माणूस आणि मशीन	प्राजक्ता बर्वे	७
५	चंद्र आहे साक्षीला	मृण्मयी सारंग	८
६	"तो".. न उमगला मला...!	भार्गवी बाबरेकर	९
७	फुलासंगे मातीस सुगंध लागे	निर्मिती देवलसी	१०
८	छत्री	रेणुका देशपांडे कुकडे	१२
९	प्रिय अशी झोप	दिशा टिकेकर	१३
१०	त्याचं असणं	सायली अक्षय देशपांडे	१४
१२	अंतर्मुख	तृष्णा आंबेकर	१६
१३	समारोप	सायली अक्षय देशपांडे	१७

प्रस्तावना

"ती" चं पान या उपक्रमाचा हा सातवा मासिकांक. म्हणता म्हणता ७ महिने या अंकाला झाले. प्रत्येक अंकात काहीतरी वेगळेपण असावं हा मानस मनात ठेवून यात सहभागी असलेल्या प्रत्येक नवोदित लेखिकेने आपलं लिखाण समृद्ध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला मी फार जवळून बघतेय.ज्याप्रमाणे एखादं लहान मूल जन्माला आल्यावर हळूहळू रांगत रांगत स्वतःच्या शक्तीचा अंदाज घेत घेत उभं राहतं आणि आपसूकच चालायला लागतं अशीच काहीशी प्रक्रिया या अंकाची आहे. सुरुवातीला लिहीत असतांना शब्दांची सांगड घालत घालत आज यात लिहिणारी प्रत्येक नवोदित लेखिका या प्रवासातून गेली आहे किंवा जाते आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही.

जे जे उत्तम उदात्त उन्नत या उक्तीला आदर्श मानत यात सातत्याने होत असलेलं लिखाण हे आम्ही दर महिन्यात आपल्या सारख्या रसिक वाचकांसाठी प्रकाशित करत असतो.कोरोनाच्या या प्रतिकुल परिस्थितीत सुद्धा यातल्या लिखाणाने वाचकांना कधीकधी प्रवास घडवला तर कधी शाळेचे रम्य दिवस आठवून दिले तर कधी पावसात चिंब भिजवलं. याच शृंखलेत यंदाचा हा अंक अनेक वेगवेगळया पैलूंनी नटलेला आहे. यावेळी या अंकात "दोन शब्द" या मथळयाखाली एक सर्जनशील लेखक असलेला माझा मित्र अक्षय वाटवे याने लेखन का करावं? असा एक सुंदर प्रश्न विचारून त्याचं उत्तर सुद्धा त्याच्या ओघवत्या शैलीत लिहिलंय. त्या उत्तराचा माझ्यासहित सगळयांनाच उपयोग होईल असा विश्वास मला वाटतो. त्याबद्दल अक्षयचे सुद्धा खूप खूप आभार.

तसं अशा बहुरंगी असलेल्या "ती"च्या शब्दप्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी होऊन आनंद घ्या..!

- सायली अक्षय देशपांडे

दोन शब्द

आपण का लिहितो? माझ्यापुरतं याचं उत्तर असं की, व्यक्त व्हायला हवं म्हणून तळमळ, आजूबाजूला घडणारं, दिसणारं, अनुभवाला येणारं आपल्या संवेदनशील मनाला जाणवतं म्हणून... म्हणून आपण व्यक्त होतो, लिहितो.

इतर लेखकांचं लेखन आपल्याला आवडतं कारण ते कायम आपल्याला आनंद देतं किंवा आपण त्याच्याशी जोडले जातो किंवा आपल्याला त्यातल्या वेदना टोचतात. आणि अशा तऱ्हेने लेखन भावतं त्याला काळाचं बंधन नसतं. ते कोणत्याही काळात वाचलं तरी ताजं वाटतं. म्हणून जे काही सांगायचं आहे, मांडायचं आहे ते जोवर विचारात नीट आकार घेत नाही तोवर थांबावं. पुन्हा लिहून पहावं. स्वतःच्या लेखनाकडे त्रयस्थपणे पाहून त्याची चिकित्सा करावी.

ललित लेखन (कथा, कविता, ललीतलेख इ.) जरी भावनिक आंदोलने, मानवी नातेसंबंध, सुख-दुःख, भावनांच्या अनेक रंगछटा, व्यक्तिमत्व या सगळयातून साकारत असले तरी त्यात एक शाश्वत विचार नक्कीच असतो. असायला हवा. साहित्य म्हणून जे काही आपण वाचतो आणि जे आपल्याला भावते त्या साहित्यकृतीकडे बारकाईने पाहिले तर असे लक्षात येते, की या प्रभावित करणाऱ्या साहित्यकृतीचा गाभा हा माणुसकी असतो.

ललितेतर साहित्याच्या बाबतीत प्रबोधनात्मक, संशोधनात्मक, चिकित्सात्म, विश्लेषणात्म, मार्गदर्शनपर, माहितीपर अशा वेगवेगळया स्वरूपात लेखाची मांडणी केली जाते. हे लक्षात घेतले पाहिजे असे मला वाटते. आणि अशा प्रकारचे लेखन करण्यासाठी त्या त्या विषयाचा सखोल अभ्यास, चिंतन, मनन संदर्भ तपासणी हे सारे आवश्यक असते. अनेक प्रकारचे ललितेतर साहित्य वाचल्यानंतर लेखाची मांडणी लक्षात येते. पुढे जाऊन असे काही आपण लिहिणार असलो तर हा मांडणीचा अभ्यास आपल्या लेखाच्या मांडणी करीता सहाय्यकारी ठरतो. लेखाच्या मांडणीनेचे 2+2 असे सरळ सोपे गणित नसले तरी अभ्यासातून स्वतःची शैली विकसित केली जावी. म्हणजे लेखाचे आशयमूल्य वाढते.

एकटाकी लिहिणे ही संकल्पना रूढ आहे, हे मान्य केले तरी असे एकटाकी लेखन पहिल्याच प्रयत्नात साध्य होणे अशी प्रतिभा दुर्मिळ. लिहून पूर्ण झाल्यानंतर किमान दोन वेळा त्रयस्थपणे लिहिलेले वाचले जावे. यात कसलेच नुकसान नक्की नाही. अनेकदा काही सुधारणा नक्की सुचतात. त्यासाठी लेखनाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. लिहिण्याची पहिली पायरी अनुभवणे ही आहे, असं मला वाटतं. हा अनुभव प्रत्यक्ष जगण्यातून मिळतो. तसाच तो इतरांच्या लेखनातूनही मिळतो का; हे तपासणे गरजेचे आहे.

साहित्यिक म्हणून ज्यांचा उल्लेख आवर्जून केला जातो त्यांच्या साहित्यकृती वाचणे गरजेचे आहेच पण त्याच बरोबर पूर्वग्रह न ठेवता जे समोर येईल तेही वाचणे तितकेच आवश्यक आहे. हे करत असताना त्या लिखाणाचा आपल्यावर काय परिणाम होतो याचाही विचार होणे गरजेचे.

लिखाणाच्या स्वरूपात व्यक्त होण्याआधीचा टप्पा म्हणजे विचार करणे. हा विचार सखोल असायला हवा. तो करत असताना विषयाकडे बघण्याची दृष्टी गंभीर हवी. भावनावेगाने सुचलेल्या दोन-चार ओळी तशाच्या-तशा पोस्ट करून मोकळं होण्याची सवय पुढे जन्माला येण्याची शक्यता असलेल्या एखाद्या उत्तम साहित्यकृतीच्या दृष्टीने घातक ठरू शकते असं मला वाटतं. त्या पेक्षा त्या दोन ओळी लिहून ठेऊन, काही काळाने पुन्हा वाचून, त्यावर विचार करून मग काहीतरी लिहिले गेले तर ते लेखन आधीच्या दोन-चार ओळीपेक्षा नक्कीच सकस असणार. मात्र एका गोष्टीची गांभीर्याने नोंद घ्या की, लेखनाला सुरुवात करण्याआधी, लेखनातून काहीतरी म्हणणे मांडण्याआधी जे म्हणायचे/मांडायचे आहे त्याचा पूर्ण अभ्यास करा. तो अनुभव स्वतःचा असेल तर त्यावर चौफेर विचार करा. जगण्याचे वेगवेगळे पैलू नीट समजून घ्यायचे असतील तर उत्तम वाचक व्हा. म्हणजे आपल्या लिखाणाला नक्कीच एक उत्तम बैठक लाभेल.

- ©अक्षय प्रभाकर वाटवे

9766991421

प्रभात

प्रभाती नभी रंग रंगले

निळी सावळी छाया सरूनी गुलाल उधळले

पहाट पक्ष्याच्या आधी याची प्रभा गात भूपाळी
रश्मी स्पर्शुनी वरचेवरी जागवी सृष्टी सारी
पहाटेस रूप याचे दिसे केशरी पिवळे.....
निळी सावळी छाया सरूनी गुलाल उधळले .....

डोंगर टेकड्यां आडून तो झरझर वर येताना
न्याहाळतो सर्वांस तो सडा शिंपितांना
पाची दल उघडून फुलराणी शोभा त्याची बघते...
निळी सावळी छाया सरूनी गुलाल उधळले...

सहस्त्ररश्मींचे दर्शन माध्यांनी जग अनुभवते
दाह टाळण्यासाठी छाया मैत्री मेघांशी करते
सप्तरंगी हास्येची लहर आकाशी मग उमटते....
निळी सावळी छाया सरूनी गुलाल उधळले.....

- संजीवनी मराठे

माणूस आणि मशीन

हल्ली काय माणसांचे जॉब जातायत म्हणे...

कोणी रोबो त्यांच्या बदल्यात आणून ठेवलाय म्हणे...

अगदी विचार बिचार सुध्दा त्याला करता येतो म्हणे...

इतकंच नाही तर कुण्या एका देशाचा, तो नागरिक सुध्दा झालाय म्हणे...

काय हो, हा रोबोट नक्की करतो तरी काय?

आपल्यात आणि त्याच्यात नक्की फरक तरी काय?

फरक नाही माहीत पण साम्य सांगते ऐका नीट

दोघांमधून मन नावाचा अवयव झालाय कायमचा delete

म्हणलेलं कोणी I am because I think

हा thought काही काळ होउ द्या जरा sink

अन्यथा याचे खूपंच भीषण परिणाम होतील

मानव निर्मित यंत्रेच जगावर कब्जा करतील

म्हणून म्हणते करा विचार, शोधून आणा परंत मनाला

जॉब्स तर जातातंचेत, उद्या कदाचित मुकाल तुमच्या जिवाला

- प्राजक्ता बर्वे

चंद्र आहे साक्षीला..

लांब कुठे तरी त्या ढगाआड तू असतोस. रोज येतोस लपंडाव खेळत खेळत लुप्त होऊन जातोस आणि पुन्हा तुझ्या येण्याची आस मनी जागवून जातोस. त्या गर्द काळोखात सुध्दा तुझा शीतल प्रकाश, गारवा मनाला दिलासा देऊन जातो की काळोख कितीही दाट असला तरी इवलासा प्रकाश मनाला सुखावतो. तुझं असणं हे सांगून जातं की प्रेम , दिलासा , साथ ही फक्त जवळ राहूनच दिली जाते अस नाही. बरेचदा फक्त असणं किंवा त्याची जाणीव सुध्दा पुरेशी असते. तू फक्त स्वतः प्रकाशमान नसतोस तर सोबतच्या चांदण्यांना सुध्दा प्रकाशित करतोस आणि स्वतः सारखं आनंदाने जगायला शिकवतो....

रात्रीची वाऱ्याची आल्हाददायक झुळूक हळूच मला खुणावते आणि मी नकळत तुझ्याकडे वळते आणि तुझ्या शीतल छायेत आल्यावर माझ्या अंगावर चांदण्याची फुलं तु बिनधास्त उधळतोस. तुझं ते निरभ्र आकाशात रुबाबात झिरपणं कोणालाही तुझ्या प्रेमात सहज पाडू शकतं. त्या मेघांनी जरी आभाळात गर्दी केली, तरी तुझं सौंदर्य यत्किंचितही कमी होत नाही, किंबहुना ते तुझी शोभा जरा जास्तच वाढवतात जणू काही तीट लावल्यासारखंच. क्षणाक्षणाला बहरत जाणारं तुझं रूप डोळ्यात साठवताना माझी नजर अपुरी पडते.तुला पाहताना तू मला एका स्वप्नासारखा भासतोस, पण तुला पाहतानाचा प्रत्येक क्षण सुंदर वास्तव आहेआणि म्हणूनच मी तुझ्या आणखी प्रेमात पडत जाते.

तू कायम आहेस. अनंत आहेस की नाहीस ते ठाऊक नाही. पण माझ्यासोबत कायम आहेस. अमावस्येला तुझं अस्तित्व नसलं तरी आठवणींच्या स्वरूपात आहेस. चंद्रकोरीमध्ये इवलंसं रूप दाखवलंस तरी पुरेसं आहे. आणि पौर्णिमेला तर पर्वणीच आहे.तुझा मुग्ध प्रकाश मला रातराणीच्या सुगंधाशी खेळवतो, तुझं चांदणं मला न्हाऊ घालतं, कुशीत घेतं. तुझ्या प्रकाशाची जादुई वलयं मला अंगाई गात निजू घालतात. आणि मी तुझ्याच स्वप्नांमध्ये तुझी अशीच अप्रतिम रूपं बघण्यात दंग होते.

अनेक गीतकरांनी त्यांच्या गीतातून तुझ्या विविध रूपाचे वर्णन केले आहे. कोणासाठी तू रात्र सुध्दा तरुण करतोस तर कोणासाठी तुझी साक्षच पुरेशी असते. कुणासाठी चंद्र मातती तर कुणी मात्र तुला जमिनीवर बोलावून गप्पा मारायच्या गोष्टी करत. तू खरच आगळावेगळा आहेस तुला पौर्णिमेचा गर्व नाही तर अमावास्येच दुःख ही नाही. आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून आनंदात जगायचे हेच तू कायम शिकवतोस.

- मृण्मयी सारंग

“तो”.. न उमगला मला...!

तो आला होता काल..
अन् बरसून गेला खूप !
कधीचे म्हणे बरसणे राहिले होते..!
मी होते अगदीच बेसावध ,
याने मागून डोळे झाकले..
तशी ही त्याची जुनीच खोड ,
काही नवे नाही त्यातले !
मग मिश्किल पणे मला पाहणे...
वेळीच न येण्याचे पुन्हा नवे बहाणे...!
हे सारे काही माझ्या,
परिचयाचे होते...
पण मीही जरा आता ,
थट्टेच्या रंगात होते !
मग उगाच मी रुसून बसले..
न बोलण्याचे सोंग वठवले!
तर याची आपली भलतीच तऱ्हा..!
मला म्हणतो थांब जरा..
मला तर बाई प्रश्नच पडले
काय खुळ याच्या डोक्यात आले?
मग मी जाऊन खिडकीत बसले!
तो हा-हा म्हणता वारा आला..!
केस माझे उडवून गेला...
क्षणार्धात हा सर-सर आला..
खिडकीतूनच शिरता झाला !
तिळ उसंत न दिली मजला ...
काय घडले कळलेच नाही..!
मी भिजले कशी?
उमगलेच नाही!
काही वेळाने सरले सारे..
मेघ सावळे गडगडणारे...
मी पुन्हा त्याच्या प्रतिक्षेत बसले..
तो येईल पुन्हा , मनास कथिले..!
त्याच्या येण्याचा , गंध मृदेचा...
मी मनात माझ्या रूजवित होते..
तो आला होता काल..
बरसून गेला खूप!
कधीचे म्हणे बरसणे राहिले होते...!

- भार्गवी बाबरेकर

फुलासंगे मातीस सुगंध लागे..

फुले साऱ्यांनाच आवडतात . रंगीबेरंगी नाजूक फुलं वातावरण सुगंधी करतात . मन प्रसन्न करतात . फुलं म्हणजे निसर्गातील सौंदर्याचा साक्षात्कार . फुलं म्हणजे निसर्गाचे हास्य ! अल्प आयुष्य घेऊन उमलणारी फुलं सारं वातावरण आपल्या अस्तित्वानं भारावून टाकतात . फुलांचा दरवळ आनंद पेरीत चोहो दिशांना फिरतो . आनंद , उत्साह अन् ऊर्जेची अनुभूती यांचा प्रत्यय देऊन जातो .

संगत श्रेष्ठ माणसाची केली तर माणूस मोठा बनतो . फूल ज्या मातीवर पडते त्या मातीला फुलाचा सुगंध येतो . एखाद्या वस्तूची अग्नीशी संगत घडली की वस्तूची राख होते . एखाद्या वस्तूची अग्नीची संगत घडलीपाण्याशी घडली की अग्नीही विझून जातो . वृक्ष वाऱ्याच्या संगतीने डोलतो , विजेच्या संगतीने जळतो . घाणीच्या संगतीने हात मळतात , साबणाच्या संगतीने स्वच्छ होतात . जशी संगत तशी घडण .

म्हणून माणसाने चांगल्याची संगत धरावी म्हणजे चांगल्याचा चांगुलपणाही आपल्याही अंगी येईल . एक सडका आंबा इतर आंब्यांना सडवतो . एक मोगऱ्याचे फूल सारा परिसर दरवळून टाकते . माणसाने नासक्यांची संगत धरू नये . त्याने फुलाच्या गंधाची मैत्री करावी.

इतिहासात हेच पाहायला मिळते . तुकारामाने विठ्ठलाची संगत धरली आणि तो स्वतः विठ्ठल होऊन गेला . शिवाजीने स्वातंत्र्यदेवतेची संगत धरली आणि ते अमर झाले . तानाजीने शिवाजी ची संगत धरली आणि इतिहास अजूनही तानाजीचा गौरव करतो .

टिळक , गांधी , नेहरू , भगतसिंग , सुभाषचंद्र , सावरकर यांनी स्वराज्याची संगत धरली आणि त्यांना नवरत्न मोल प्राप्त झाले . महात्मा फुले , महर्षी शिंदे , डॉ.आंबेडकर यांनी समाजसेवेची संगत जडली . त्यांच्या कीर्तीचा सुगंध आजही दरवळतो . रवींद्रनाथ टागोर , मुन्शी प्रेमचंद प्रभृतींनी शारदेची संगत धरली आणि त्यांना जागतिक सन्मान मिळाला. संगत चांगली नसेल तर माणूस बिघडतो . दहा चांगल्या आंब्यात एखादा आंबा सडका ठेवला तर तो आपल्या बरोबर दहाही आंब्यांना सडवितो म्हणून वाईट संगत करु नये , चांगल्याची करावी .

पुस्तकांची संगत केली की चांगले विचार आपल्या मनात घोळत राहते . वीर पुरुषांची संगत केली तर आपल्याही मनात वीरवृत्ती जागृत होते . देशभक्तांची संगत केली तर आपल्यालाही अंतकरणात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित होते . जशी संगत करावी तसे विचार मनात येतात , विचारांप्रमाणे आचार होतात आणि मन देखील विचारांप्रमाणे घडते .

सज्जनांची संगत ही कामधेनू , अमृत , कल्पवृक्ष यापेक्षाही श्रेष्ठ होय असे संत सांगतात , ते खरे आहे . कारण कामधेनु , अमृत , कल्पवृक्ष ह्या शक्ती आहेत . त्या मिळाल्या तरी त्यांचा उपयोग जर वाईट तऱ्हेने झाला तर जगाचे अकल्याणच होईल . आज अनुशक्ती मानवाला मिळाली आहे . पण तिचा दुरुपयोग मानवी संस्कृती नष्ट करील , ती शक्ती चांगल्या करिता उपयोगी लावली पाहिजे असा विचार चांगल्या मनातच येऊ शकतो . हे चांगले मन सज्जनांच्या संगतीने घडते .

संगत सद्गुणांची , अभिरुची आणि सज्जनांची करावी म्हणजे या **फुलाचा गंध माणसाला लागून तेही सुगंधित होतील , आपल्या राष्ट्राला सुगंधित करतील .**

विश्वकवी रवींद्रनाथांनी म्हटलेच आहे - **फुले पायदळी तुडवणाऱ्यांच्याही पायाला सुगंध बहाल करतात . ऊन , वारा , पाऊस या साऱ्यांचीच झुंजत जगायला प्रसन्नता देणारी फुलं खरंच महान म्हणायला हवी . फुलं कुठलाही भेदभाव करीत नाहीत . डाव्या आणि उजव्या दोन्ही हातांना ती सारखाच सुगंध देतात .**

- निर्मिती देवलसी

छत्री

बेभान बरसणारा पाऊस...

आडोश्याला आता मुंगीही मावणार नाही, एवढी दाटी...

आता छत्रीला तिचं अवतारकार्य करण्याखेरीज गत्यंतर नाही...

पण...

विजांचा कडकडाट,

सरींचा थयथयाट,

असल्या काळोख्या तुफानात छत्री टिकेल का?

मग आठवतं,

अफाट शहरात,

अनंत चेहऱ्यांत,

गर्दीच्या तुफानात आपणही टिकलोय ना!

चिमुरडं असलं तरी, या अक्राविक्राळ नगरात डोक्यावरचं हेच एक छत तेवढं हक्काचं आहे...

जलप्रलयापेक्षा मानवप्रलयाने भांबावलेली तू,

माझ्या इवल्याश्या छत्रीखाली येशील का?

कोरडी, स्वच्छ राहशील असं वचन नाही देत, पण...

दोघेही अर्धे अर्धे भिजुयात...

- सौ. रेणुका देशपांडे कुकडे

प्रिय अशी झोप

रविवार म्हटले की, आधीच शरीरात आळस संचारलेला. रात्रीच ठरवले की, उद्या सकाळी १० वाजेपर्यंत ताणुन द्यायची. तसेही रोज सकाळी कॉलेज असल्यामुळे आईचं सुरु व्हायचं " दीपा ऊठ, उशीर होईल कॉलेज ला जायला, मग काय उठा लवकर. पण मी आज ठरविले रात्री मस्त एखादा सिनेमा बघायचा आणि मगच झोपायचे. झाले असे की सिनेमा पाहण्याच्या नादात रात्री १ कधी वाजला ते कळलेच नाही.

झोपेत असतानाच दारावरची बेल वाजली. कसेबसे झोपेतच उठले आणि दार उघडले. दुधवाले काका आले होते. दुधाचा पुडा घेतला आणि गेले परत झोपायला. पण कसलं काय, परत बेल वाजली. अरे यार, हे काय असे म्हणत दार न उघडताच परत झोपी गेले. पण परत बेल वाजली, मग काय शेवटी उठावेच लागले.

बघते तर काय सगळी मित्रमंडळी आलेली. हा काय प्रकार आहे मला कळेचना, मी रागातच विचारलं "कशाला इतक्या सकाळी आलात तुम्ही? झोपू द्यायचं ना मला."

कोणी काहीच बोलेना, सगळे सरळ आत. तेवढ्यात पिहू म्हणाली, "अगं, दिपा तुला झोपायचं आहे ना, मग तु झोप. आम्ही आमचं काम करतो " आणि मला सगळयांनी चक्क माझ्या रूम मध्ये बंद केलं. काय चाललंय काही कळत नव्हतं, पण विचार केला झोपायला तर मिळतंय ना, मग झोपून घेऊ. आणि मी आनंदात परत झोपी गेले.

थोड्याच वेळात पिझ्झा, पावभाजी, सँडविच आणि माझी सगळयात आवडती पाणीपुरी, अहाहा! हे सगळं मला दिसायला लागलं तेवढ्यात मला जाग आली. रुमच्या बाहेर जायला निघणार तेवढ्यात परत सगळी मित्रमंडळी समोर. आणि बघते तर काय, समोर गुलाबाच्या पाकळयांच्या पायघड्या. मला खूप आश्चर्य वाटले. मी एक एक पाउल टाकत हळुवारपणे पुढे जात होते. हॉल पूर्ण फुलांनी आणि फुग्यांनी सजला होता. पुढे एका टेबलवर मोठा केक ठेवला होता.

तो केक कापण्यासाठी मी टेबलजवळ जाणार..

तेवढ्यात थंडगार पाण्याचा अभिषेक झाला. मी दचकुन जागे झाले. समोर आई उभी होती. रागातच माझ्याकडे बघून म्हणाली. "अगं गधडे उठ आता १० वाजलेत, किती झोपणार अजून"

- दिशा टिकेकर

त्याचं असणं

मनात साठलेलं सगळं सांगण्यासाठी कोणीतरी हवं असतं. ते ऐकायला, ते अनुभवायला.त्याला प्रतिसाद म्हणून आपलं सगळं तो ऐकून घेणं.आणि कृपादृष्टीचा एक प्रेमळ कटाक्ष आणि " मी आहे" असं म्हणतांना नकळत आपल्यावर असणारा त्याचा हक्क.मनात असलेलं सगळं सुख दुःख सांगायला ते ऐकून घ्यायला कोणीतरी हवं असतं. आणि त्याला हे सगळं सांगितल्यावर किती अलगदपणे आपण मोकळं होतो या फार मोठ्या वाटणाऱ्या दुःखातून?याचं कारण म्हणजे त्याचं असणं....

तो कायम आपल्यासोबत असावा असं खूप वाटतं अगदी आतुरता निर्माण होऊन त्याच्या भेटीची आस लागते पण तो आहे हे तो फार आधीच बोलून कबूल करून गेलाय हे मात्र कुठेतरी कुपीसारखं बंदच राहून जातं. जेव्हा त्याच्या असण्याची गरज,हुरहूर जागी होते तेव्हा अलगद आपलं मन त्याच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा शोधण्यासाठी अगदी लाटेप्रमाणे किनाऱ्याची ओढ घेतं आणि मग जागी होते ती वचनांची, आठवणींची शृंखला. त्या कुपीतून या सगळ्या अत्तरांची उधळण उधळल्या जाते आणि मग परत मनाला दिलासा मिळतो तो त्याच्या " मी आहे" या फक्त दोन शब्दांनी..

खरंच ,त्याचं असणं ही भावना इतकं काही मिळवून देते का? त्या दोन शब्दात साठलेला विश्वास,सत्य असत्यांचा साक्षात्कार आणि त्याच्या अस्तित्वाची एक गोड आठवण या सगळ्या नाजूक प्रवासाची सुरुवात होते ती त्याच्या असण्याने...

त्याचं असणं ही एक सुखद अनुभूती मनाला विचाराला कृतीला एक नवीनच बळ देऊन जाते. आणि मग प्रत्येक कणाकणात त्याचं अस्तित्व, प्रत्येक श्वासात त्याचा गंध,त्याचं तेज ही आपसूकच जाणवायला लागतं.

प्रेम आहे हे शब्द जरी प्रेम व्यक्त करत असले तरी ते हवेच्या झुळुकेसारखे आहेत.पण "मी आहे" हा विश्वास अगदी पहिल्या पावसाच्या थेंबांनी मातीला दिलेल्या तृप्तीसारखे आहेत.मनाला चिंब भिजवून टाकणाऱ्या त्याच्या असण्यासारखे आहेत.'तू माझाच आहेस'असा अट्टहास करून उगाच त्याची मक्तेदारी न घेता 'तू असाच माझ्यासोबत रहा' हे म्हणायला भाग पाडते.आणि तीच खरी विश्वासातली महत्वाची ठेव असते.

त्याचं असणं खूप काही देऊन जातं.मनाला आनंद,अतृप्तीला तृप्ती आणि वास्तवाला त्याच्या अस्तित्वाची जोड.प्रसंग कुठलाही ओढवला तरी त्याची मदत,त्याचं मत घ्यावंसं वाटतं. अगदी परिस्थितीला आपण अलगद सांभाळू शकत असलो तरी तो आहे हे परत एकदा मनाला सांगावसं वाटतं म्हणून त्याची मदत हवीहवीशी वाटते...
तेवढाच त्याचा सहवास मनाला एक नवी उमेद देऊन जातो.

तो असला की या मनातल्या गुंत्याला अगदी अलगद सुटायला सुरुवात होते.आणि बंधनांची कुठलीच आडकाठी नसणारी मुक्ताई निर्माण होते.

या सगळया आनंदाचं एकच मूळ आहे ते म्हणजे त्याचं असणं...आपल्या सगळ्या गोष्टी त्याला सांगणं त्याच्याशी हितगुज करणं आणि संवाद साधणं आणि कर्ता करविता तो आहे हे समजून आपण फक्त निमित्यमात्र असणं ही भावना कायम मनात ठेवणं हे फार सुखावह असतं.
त्याचं अभंग असं कृपाछत्र त्याची कृपादृष्टी त्याचा आशिर्वाद.
कारण त्याचं असणं हे खूप काही देऊन जातं आणि "मी आहे" हे ठामपणे सांगणं हे दोन शब्द अगदी स्वर्गीय सुख देऊन जातात..

कारण फक्त एकच त्याचं असणं,त्याचं हसणं, एक सहानुभूतीपूर्वक कृपादृष्टी आणि " मी आहे" असं बोलताना नकळत आपल्यावर असणारा त्याचा हक्क.....आणि म्हणूनच महत्वाचं असतं ते त्याचं असणं....!

- सायली अक्षय देशपांडे

अंतर्मुख..

बराच काळापासून वाट होती त्याला माझ्या
बदलण्याची,,
मला मात्र नशा सारी लखलखत्या चांदण्यांना
कवेत घेण्याची,,
वाटलं त्यात काय अवघड आहे ,आता सगळंच
सहज शक्य आहे ..
मार्ग असला कठीण तरी धीरानं ध्येयाला गाठीन
आलीत कितीही संकटं जरी क्षितीजाला पार
करीन..
पंखात बळ एकवटून आकाशी झेप घेतली अन्
परत माघार न घेण्याची गाठ मनाशी बांधली..
प्रवासाला निघताच ऊन अन् पावसाने पाठलाग
सुरू केले
पण मी थोडंच त्याला जुमानले,,मग
वाटेतल्या काटेरी झुडपांना क्षणार्धात दूर करत
गुलाबाला तुडवले अन् वटवृक्षालाही
झिडकारले
पुढे एका वळणावर सहजच विसावले..
एकाकी मजला पाहून 'अहंकार' आला पुढे
'गर्वाशी' तर याचे कधीच नव्हते वाकडे..
'मी'पणा केल्याविना आता मोठेपणा मिळत
नाही
'द्वेष' आणि 'मत्सर' काही यांची पाठ सोडत
नाही..
या साऱ्यांच्या सोबतीने एक अंक संपला
कधीच
गड जिंकल्याच्या आनंदात राहिले नव्हते माझी
मीच..
पुढं काय करावं काही केल्या सुचेना
"सारी दुनिया मुट्ठी मे है अब" ही मनीची
धारणा..
आता खरी गरज होती अंतर्मुख
होण्याची,,,मग
भारावलेल्या मनानेच निद्राधीन झाले
पहाटे पहाटे अचानक स्वप्नी आले
जणू हे विश्व क्षणभर थांबले..
पुन्हा नव्याने जन्मण्यासाठी

- तृष्णा खर्डेनवीस आंबेकर

समारोप

रसिकहो, गेले 2 वर्ष आपण खूप वेगळ्या परिस्थितीत अडकलो आहे. सगळे जण परोपरीने या नकारात्मकतेला सकारात्मक कसं करता येईल यासाठी प्रयत्न करत आहेत. तसा हा दोन वर्षांचा घरी बसण्याचा कंटाळा सगळयांना आलाय हे होणं सुद्धा स्वाभाविक आहे.

२ वर्षाचा हा नको असलेला प्रवास सुद्धा आपण स्वीकारला आणि जसं जमेल तसं यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न अजूनही करतोय. ही सगळी परिस्थिती निवळून लवकरच आपलं आयुष्य पूर्ववत व्हावं हीच ईश्वरचरणी प्रार्थना..याच सकारात्मकतेच्या शृंखलेत आमचं हे " ती" चं पान आपल्या साठी आणलं. आपल्या छंदांना आवडींना वेळ मिळायला लागला. आणि या लेखणीचा प्रवास सुरु झाला. आपलं प्रेम असंच असू द्या. पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह…!

– सायली अक्षय देशपांडे

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

आमचे आधीचे प्रकाशित अंक :

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

जून २०२१

जुलै २०२१

ऑगस्ट २०२१

आपल्याला जर अंक आवडला असेल तर कृपया आपले अमूल्य मत आम्हाला नक्की कळवा, खाली अभिप्रायासाठी लिंक देत आहोत..

अभिप्राय

दूरस्थ कुणी दे तुझ्या करी ही कविता
वाहते जिच्यातून त्याची जीवन सरिता
खळखळे अडखळे सुके कधी फेसाळे
परी अखंड शोधे वाट समुद्राकरिता
समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,
कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा?
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा
तव अंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा....!”

- कुसुमाग्रज